**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १० मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **जिष्णूदेव वर्मा यांनी घेतली महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ.**
2. **अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापकांची साडे पाच हजार पदं या शैक्षणिक वर्षात भरली जाणार.**
3. **11 जिल्ह्यांसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयं मंजूर; अमरावती, यवतमाळ, बुलढाणा आणि नागपूरचा समावेश.**
4. **पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एलपीजी उत्पादन वाढवण्याचे सरकारचे आदेश; पेट्रोलियम पदार्थांसाठी एस्मा लागू.**

राज्यपाल शपथविधी

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा शपथविधी समारंभ आज मुंबईत लोकभवन इथं पार पडला. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी वर्मा यांना पदाची शपथ देववली. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते.

विधीमंडळ

राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना वर्षाअखेरपर्यंत अखंड वीज पुरवठा होईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. ऐकूया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून-

***(व्हॉइस कास्ट - हेमांगी)***

***समाजमाध्यमावर बदनामीचे प्रकार थांबवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील हे ठरवण्यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. राहुल कुल यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी राज्य सरकारने ४३ कोटींच्या निधीची तरतूद केल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याशिवाय महा सायबर सेफ ॲप हे ॲप्लिकेशन सुरू करण्यात येणार आहे, सायबर फसवणूक कोणकोणत्या प्रकारे केली जाते याची माहिती या ॲपवर असेल. दर***

*महिन्याला नागरिकांना जनजागृतीसाठी २१ कोटी मेसेज पाठवले जातील, असं कदम यांनी सांगितलं. प्रशांत ठाकूर, विकास ठाकरे यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला. राज्यातल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक संवर्गात एकंदर ११ हजार ९१८ जागा रिक्त असून त्यापैकी सुमारे ५ हजार ५०० पदं भरायची मान्यता मिळाल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. रणजितसिंह मोहिते-पाटील आणि इतरांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या शैक्षणिक वर्षात ही भरती पूर्ण होईल, असं त्यांनी सांगितलं. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तासिका तत्त्वावर प्राध्यापकांची नियुक्ती करायची गरज राहणार नाही, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. उच्च शिक्षणसंदर्भात पीएम उषा योजनेच्या धर्तीवर राज्यात सीएम उषा योजना प्रस्तावित असल्याचंही त्यांनी नमूद केलं. राज्यातल्या १५ विद्यापीठांमध्ये एकंदर २ हजार ६०० शिक्षकीय पदं मंजूर असून त्यापैकी १ हजार ४९७ पदं रिक्त आहेत. यातल्या ६८७ पदं भरायची मान्यता मिळाली आहे, असं सरकारनं लेखी उत्तराद्वारे सांगितलं. राज्यावर अकरा लाख कोटींपेक्षा जास्त कर्जाचा बोजा असून राज्य प्रचंड कर्जात बुडत असल्याची टीका जयंत पाटील यांनी केली. अर्थसंकल्पावरील चर्चेत ते आज विधानसभेत बोलत होते. सरकारने ज्या घोषणा केल्या त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूदच नाही, मागणी नसताना मोठमोठे रस्ते बांधण्यात सरकारला रस असून नागरिकांना आवश्यक असणाऱ्या गोष्टी करण्यात नाही अशी टीका त्यांनी केली. तर इराण विरुद्ध इस्राएल अमेरिका युद्धाचे संकट आता महाराष्ट्रात जाणवत असून काळाबाजार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचं काँग्रेस आमदार नाना पटोले पत्रकारांशी बोलताना म्हणाले. सरकारने काळाबाजार तात्कळ थांबवावा आणि गॅस सिलेंडर स्वस्त दरात उपलब्ध करून देण्याची त्यांनी मागणी केली. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी हेमांगी कुळकर्णी)*

अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय

राज्यात 11 जिल्ह्यांसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयं मंजूर करण्यात आल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांना दिली. यांत ठाणे, रत्नागिरी, पुणे, सातारा, सोलापूर, जळगाव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे.

*(होल्ड बाईट - बावनकुळे - ४२ सेकंद)*

प्रत्येक जिल्ह्याला लागणाऱ्या खाजगी भू-करमापकाची संख्या, त्यांची शैक्षणिक अर्हता, नेमणूक आणि प्रशिक्षण आदींबाबत सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून हे खाजगी भू-करमापक शासकीय भू-करमापकांसोबत काम करतील, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

विधिमंडळ/ मेळघाट

मेळघाटातील दुर्गम गावांना वीजपुरवठा करण्यासाठी शासनानं सोलर मायक्रो ग्रीडचा पर्याय स्वीकारला आहे. या पद्धतीत प्रत्येक घराला स्वतंत्र सौर प्रणाली देण्याऐवजी गावात मोठ्या क्षमतेचा सौर प्रकल्प उभारून त्याची मायक्रो ग्रीड तयार केली जाणार आहे. बॅटरी स्टोरेजच्या सहाय्यानं तयार होणारी वीज गावातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.अमरावती जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील मेळघाट परिसरातील गावांमध्ये वीजपुरवठा आणि अन्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रश्न विधानसभेत सदस्य सुलभा खोडके यांनी उपस्थित केला. या चर्चेत सदस्य जयंत पाटील आणि दिलीप वळसे-पाटील यांनी सहभाग घेतला.

लोकसभा

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव आज लोकसभेत मांडण्यात आला. विरोधकांच्या गदारोळामुळे १२ वाजेपर्यंत तहकूब झालेलं सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर कॉँग्रेसचे खासदार डॉ. मोहम्मद जावेद यांनी हा प्रस्ताव मांडला. सभापती बिर्ला यांनी विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात बोलू दिलं नाही, तसंच विरोधी पक्षाच्या महिला खासदारांबाबत असंसदीय वक्तव्य केलं, असा आरोप जावेद यांनी यावेळी केला. सदनाचं कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निष्पक्ष दृष्टिकोनाचा अभाव बिर्ला यांच्या वागण्यात दिसून आला, असंही ते म्हणाले. सध्या लोकसभेत या प्रस्तावावर चर्चा सुरू आहे.

नक्षल आत्मसमर्पण

महाराष्ट्र शासनाच्या आत्मसर्पण योजनेनं प्रभावित होऊन गोंदिया जिल्ह्यामध्ये एम एम सी म्हणजेच महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड झोनचा प्रवक्ता तसंच SZCM पदावर कार्यरत जहाल माओवादी अनंत उर्फ विकास नागपुरे याच्यासह, 2 DVCM, 1 कमांडर, 6 एसीएम, 4 सदस्य अशा एकूण 14 माओवाद्यांनी काही दिवसांपूर्वी

गोंदिया जिल्हा पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांची आता पुनर्वसन प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, विकास नागपुरे आणि त्यांची पत्नी रानो नरोटे यांनी आत्मसमर्पण न केलेल्या नक्षलवाद्यांना शस्त्रं त्यागण्यासाठी आवाहन केलं आहे.

***(होल्ड बाईट - नक्षल अपील - ३६ सेकंद)***

इस्मा

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे इंधन पुरवठ्यात येणारे अडथळे आणि एलपीजी पुरवठ्याच्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर सरकारनं तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. या अतिरिक्त उत्पादनाचा वापर घरगुती एलपीजी वापरासाठी करण्याचे आदेशही जारी केले आहेत. सरकारनं घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य दिलं असल्याचं, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं म्हटलं आहे. साठवणूक आणि काळाबाजार टाळण्यासाठी दोन सिलिंडरमधल्या नोंदणीचा कालावधी २५ दिवसांचा करण्यात आला आहे. दरम्यान, पश्चिम आशियातल्या सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं नैसर्गिक वायूचं उत्पादन, पुरवठा, समतोल वितरण आणि उपलब्धतेचं नियमन करण्यासाठी एस्मा अर्थात आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ लागू केला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यासाठी काही क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आलं आहे. यामध्ये CNG, PNG, एलपीजी उत्पादन यांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत जल जीवन मिशनला डिसेंबर 2028 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या अंतर्गत एकूण खर्च 8 पूर्णांक 69 लाख कोटी रुपये इतका करण्यात आला असून त्यात केंद्राचा वाटा 3 पूर्णांक 59 लाख कोटी रुपये असेल. ‘सुजलाम भारत’ या राष्ट्रीय डिजिटल सेवेअंतर्गत प्रत्येक गावाला स्वतंत्र सुजल गाव सेवा क्षेत्र आयडी देऊन पाणीपुरवठा यंत्रणेचं डिजिटल मॅपिंग करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

हवामान

विदर्भातील अकोला जिल्हयात आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या चोवीस तासात अकोला जिल्हयात सर्वाधिक 40 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली, तर वाशिम, अमरावती, वर्धा, यवतमाळ या जिल्हयांमध्ये तापमान 39 अंश सेल्सिअसच्या घरात आहे. नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि बुलढाणा या जिल्हयांमध्ये तापमान 38 अंश सेल्सिअसच्या पुढं आहे. दरम्यान, येत्या 13 आणि 14 मार्च रोजी नागपूरसह वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्हयांमध्ये वादळी पर्जन्यमानाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे.

*****